सत्यमेव जयते
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२२८४६/४७ comm.urban@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.ना.बँका/1-सआ/ना.सह.बँका कर्म.भरतीपॅनेल/2022/1383 दिनांक :14/06/2022

## - : कार्यालयीन आदेश :-

**विषय : राज्यातील नागरी सहकारी बँकांमधील नोकरभरती प्रक्रीया राबविणेसाठी एजन्सी पॅनेल तयार करणेबाबत..**

**संदर्भ :** 1. महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील आदेश क्रमांक युआरबी 1818/प्रक्र9/शिकाना/7-स दिनांक 21/01/2019

2. शासन पुरक पत्र क्र.युआरबी 1818/प्रक्र9/शिकाना/7-स दिनांक 29/11/2021

राज्यातील नागरी सहकारी बँकांमधील नोकरभरती प्रक्रीया ऑनलाईन पद्धतीने राबविणेबाबत शासन आदेश दिनांक 21/01/2019 अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. त्यानुसार नागरी सहकारी बँकांमधील नोकरभरती प्रक्रीया ऑनलाईन पद्धतीने राबविणेसाठी खालील प्रमाणे एजन्सीज ची नियुक्ती करण्यात आली आहे-

i. इंडियन बँकींग पर्सनल सिलेक्शन बोर्ड (IBPS)
ii. वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टीटयूट ऑफ को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट, पुणे (VAMNICOM)
iii. इंडीयन इन्स्टीटयूट ऑफ बँकींग ॲण्ड फायनान्स, मुंबई
iv. धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंध संस्थान, नागपूर

तथापि सदर शासन आदेशान्वये करण्यात येत असलेल्या नोकर भरतीमध्ये काही अडचणी येत असल्यामुळे संदर्भ क्रमांक 2 चे शासन पुरकपत्रान्वये काही मार्गदर्शक सूचनांचा नव्याने समावेश केला आहे. सदर आदेशातील निर्देशानुसार राज्यातील नागरी सहकारी बँकांमधील नोकरभरती प्क्रीया राबविणेसाठी या कार्यालयाकडून खालीलप्रमाणे संस्थांचा नमूद अटी व शर्तीचे अधिन राहून नागरी सहकारी बँकांचे नोकर भरतीसाठीच्या एजन्सी पॅनेल मध्ये समावेश करण्यात येत आहे.

1. दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स फेडरेशन लि., 4था मजला, भारतीय क्रीडा मंदीर, नायगांव वडाळा, मुंबई 400 031
2. महाराष्ट्र स्टेट को-ऑप.बँक्स असोसिएशन लि., मुंबई शिल्पीन सेंटर, फोर्ट, मुंबई 400 032
3. पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि., ऋतुरंग संकुल, अरण्येश्वर कॉर्नर, पुणे सातारा रोड, पुणे 411 037
4. सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप.असोसिएशन लि., सोलापूर, 113 अ, सिद्धेश्वर पेठ, एसबीआय ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर 413 001
5. कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स् सहकारी असोसिएशन लि., 1458, बह.जी.एन.चेंबर्स, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर 416 012
6. सातारा जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., 108/10क/3, खेड, जरंडेश्वर नाका, हनुमान मंदिरा जवळ, सातारा 415 001
7. दि नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन मर्या., नाशिक, 4, पहिला मजला विश्वज्योती अपार्टमेंट, विश्वास बँकेचेवर, गोविंदनगर (हॉटेल प्रकाश मागे), मुंबई नाका, नाशिक 422 009

राज्यातील नागरी सहकारी बँकांमधील नोकरभरती प्रक्रीयेमध्ये पारदर्शकता, अचूकता व विश्वासार्हता येण्यांच्या दृष्टीने उपरोक्त प्रमाणे नोकरभरती एजन्सी पॅनेलवर समावेश करण्यात आलेल्या संस्थांना खालीलप्रमाणे अटी व शर्तीचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहील-

**अटी व शर्ती-**

1. नागरी सहकारी बँकांच्या नोकरभरतीसाठी एजन्सीची नामतालिकेची वैधता दिनांक 31 मार्च, 2024 पर्यंत राहील.
2. नामतालिकेवर समावेशासाठी या कालावधीनंतरही प्राप्त होणाऱ्या पात्र संस्थांचा सुद्धा नामतालिकेमध्ये समावेश करता येईल. तथापि त्यांचा वैधता दिनांक ही 31 मार्च, 2024 राहील.
3. नामतालिकेवरील संस्थांचे एक वर्षातील कामगिरी (performance) पाहून त्यांना पुढील वर्षासाठी मुदतवाढ (extention) बाबत निर्णय घेता येईल.
4. सदर एजन्सीमधील संचालकांना , ते संचालक असलेल्या नागरी सहकारी बँकेत नोकर भरतीची प्रक्रिया राबविताना सदर एजन्सीची नेमणूक करता येणार नाही.
5. नोकर भरतीची प्रक्रिया राबविणाऱ्या एजन्सीमध्ये संबंधित नागरी सहकारी बँकेचे पदाधिकारी व संचालक मंडळ तसेच इतर अधिकारी / कर्मचारी अथवा त्यांचे नातेवाईक यांचे हितसंबंध गुंतलेले नसावेत.
6. सदर एजन्सीबरोबर संबंधित बँकेने गोपनियतेचा करार करणे आवश्यक राहील.
7. बँकेने सदर एजन्सीकडे काम देताना बँकेच्या संचालक मंडळाचा ठराव घ्यावा.
8. सदर एजन्सीने काम करताना त्या बँकेला आवश्यक असणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या लक्षात घेऊन व त्यांचे कार्यक्षेत्र लक्षात घेऊन स्थानिक व संपूर्ण राज्यातील एका वर्तमान पत्रात जाहिरात देणे, अर्ज मागविणे, छाननी करणे व परिक्षा घेणे व त्यांच्या निकालाची प्रत देणे बंधनकारक राहील.
9. सदर प्रक्रीया ही जास्तीत जास्त दोन महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करणे एजन्सीला बंधनकारक राहील.
10. एजन्सीने घ्यावयाच्या परिक्षेची फी ठरविण्याचे अधिकार संबंधीत एजन्सीला राहतील. ही बाब संबंधीत बँक व एजन्सीने सामंजस्याने ठरवावी.
11. ज्या बँकेला कर्मचाऱ्यांची भरती करावयाची आहे, त्यांनी या कार्यालयाने ठरवून दिलेल्या मान्यता प्राप्त एजन्सीकडून निविदा मागवाव्यात व नंतर बँकेने त्यावर निर्णय घ्यावा.
12. सदर एजन्सीने राज्यातील नागरी सहकारी बँकांची नोकर भरती करताना शासन निर्णय दिनांक 21/1/2019 तसेच 29/11/2021 मधील सूचनांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.
13. नामतालिकेवर पुढील वर्षाच्या नुतनीकरणासाठी संबंधीत एजन्सीने त्यांचे मागील एक वर्षाच्या कालावधीत केलेल्या कामकाजाच्या तपशीलासह प्रस्ताव फेब्रुवारी, 2024 मध्ये या कार्यालयास सादर करावा.
14. नोकर भरतीबाबत एजन्सीच्या कामकाजात गैरव्यवहार / अनियमीतता निदर्शनास आल्यास तात्काळ संबधीत एजन्सीचे नांव एजन्सी नामतालिकेवरून कमी करण्यात येईल व भविष्यात सदर एजन्सीस काळया यादीत (Black List) टाकण्यात येईल.

(अनिल कवडे)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

1. श्रीमती सायली भोईर, मुख्य कार्यकारी तथा सचिव, दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स फेडरेशन लि., 4था मजला, भारतीय क्रीडा मंदीर, नायगांव वडाळा, मुंबई 400 031

2. श्रीमती स्वाती पांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र स्टेट को-ऑप.बँक्स असोसिएशन लि., मुंबई शिल्पीन सेंटर, फोर्ट, मुंबई 400 032

3. ॲड.सुभाष मोहिते, अध्यक्ष, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि., ऋतुरंग संकुल, अरण्येश्वर कॉर्नर, पुणे सातारा रोड, पुणे 411 037

4. अध्यक्ष, सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप.असोसिएशन लि., सोलापूर, 113 अ, सिद्धेश्वर पेठ, एसबीआय ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर 413 001

6. अध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स् सहकारी असोसिएशन लि., 1458, बह.जी.एन.चेंबर्स, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर 416 012

6. अध्यक्ष, सातारा जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., 108/10क/3, खेड, जरंडेश्वर नाका, हनुमान मंदिरा जवळ, सातारा 415 001

7.अध्यक्ष, दि नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन मर्या., नाशिक, 4, पहिला मजला विश्वज्योती अपार्टमेंट, विश्वास बँकेचेवर, गोविंदनगर (हॉटेल प्रकाश मागे), मुंबई नाका, नाशिक 422 009

प्रत माहितीस्तव सविनय सादर -
मा.अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई 400 032

प्रत :
1. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन), सर्व
2. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सर्व

त्यांना कळविण्यात येते की, सदर बाबत आपले अधिनस्त सर्व नागरी सहकारी बँकांचे निदर्शनास आणून देण्यात यावे.